Vol 3 Issue 5 Nov 2013

Impact Factor : 1.9508 (UIF)

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

IMPACT FACTOR : 1.9508 (UIF)

Welcome to ISRJ

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2230-7850

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume-3, Issue-5, Nov-2013
ISSN 2231-5063
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# ''करवीर – पेशवे संबंधाचा मराठा सत्तेवरील परिणाम – एक अभ्यास''

## वंदना रामचंद्र लोंढे
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर ता. वाळवा, जि. सांगली

**सारांश:** करवीरचे राज्य महाराणी ताराबाईंनी इ.स. 1710 मध्ये पन्हाळा येथे स्थापन केले. राजाराम महाराजांच्या वंशजांनी हे राज्य चालविले आणि इ.स. 1812 पर्यंत म्हणजे सुमारे 100 वर्षे त्यांचे स्वातंत्र्य कायम टिकविले.[1] 20 फेब्रुवारी 1707 रोजी अहमदनगर येथे औरंगजेबाचा मृत्यू झाला. त्याचा द्वितीय पुत्र आजम ह्याने अंतिम क्रिया पार पाडल्यावर स्वतःला सम्राट घोषित केले. आजम सर्वांना घेऊन उत्तरेकडे निघाला. त्याच्या बरोबर शाहू व सर्व बंदिस्त मंडळी होती.[2]

**प्रस्तावना:**

नर्मदा पार केल्यानंतर भोपाळ जवळ वायव्येला 20 मैलावर दोराहा येथे छावणी पडली असता शाहूला आझमशहाने मराठ्यांचे राज्यात दुही निर्माण व्हावी या दृष्टीने कैदेतून मुक्त केले. 8 मे 1707 रोजी शाहूने मुगल छावणी सोडली.[3] मुगल छावणी सोडून महाराष्ट्रात आल्यावर शाहूला ताराबाईने गादी देण्यास विरोध केला. यातूनच 12 ऑक्टोंबर 1707 रोजी खेड येथे लढाई झाली.[4] यात शाहूचा विजय झाला व त्याने स्वतःला 12 जानेवारी 1708 रोजी सातारा राजधानीत स्वतःला छत्रपती म्हणून राज्याभिषेक केला. तर करवीर (पन्हाळा) ला ताराबाईने गादी स्थापन केली. 17 नोव्हेंबर 1713 रोजी बालाजीस पेशवाईची वस्त्रे देण्यात आली.[5] येथूनच पेशवाईचा कालखंड सुरु झाला व येथूनच पुढे करवीर–पेशवे संबंध सुरू झाले. याचा परिणाम सर्व मराठी सत्तेवर कसा झाला यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न प्रस्तूत शोध निबंधात केलेला आहे.

### 1) कान्होजी आंग्रे प्रकरण :–

छ. राजारामांनी कान्होजी आंग्रेला 'सरखेल' हा किताब देऊन इ.स. 1698 मध्ये आरमार प्रमुखपदी नेमणूक केली होती. ताराबाईच्या काळातही कान्होजीने आपले लश्करी सामर्थ्य मजबूत ठेवून सर्व परकीय सत्तेवर म्हणजे सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज यांच्यावर आपले वर्चस्व ठेवले. आपला दबदबा कायम ठेवला. शाहू–ताराबाई यांच्यात यादवी सुरु झाल्यावर चंद्रसेन जाधवाच्या चिथावणीमुळे कान्होजी ताराबाईच्या पक्षात येऊन शाहू विरूध्द संघर्ष करू लागला. ताराबाईने कान्होजी आंग्रेकडून आपले मांडलिकत्व स्वीकारण्या संबंधीची शपथही घेतली होती.[6] परंतु बाळाजी विश्वनाथाने साम नीतीचा अवलंब करुन शाहू महाराजाचा पक्ष कसा न्यायी आहे हे समजावून सांगितले व त्याला शाहूकडून पूर्वीचीच सरखेल पदवी देऊन आपल्या बाजूला वळवून घेतले. यामुळे आरमारावर पेशव्यांचे वर्चस्व निर्माण झाले व करवीरकरांचे आरमारी महत्त्व कमी झाले. यातून करवीर–पेशवे संबंध बिघडले.

### 2) बंडखोर सरदार व मराठी सत्ता :–

कोल्हापूरची रक्त शून्य राज्यक्रांती झाल्यावर ताराबाई व तिचा पुत्र शिवाजी छ. संभाजीच्या कैदेत पडले. यावेळी दमाजी थोरात ताराबाईचा सरदार करवीर सोडून मोगलांना मिळाला व शाहूच्या प्रदेशात दंगा करण्यास सुरुवात केली. दमाजी थोराताच्या हालचाली पुण्याच्या परिसरात असल्यामुळे त्या थांबविण्याची निकड पेशव्याला अधिक होती.[7] पेशवा बाळाजी विश्वनाथाने मोगल सुभेदार सय्यद हुसेनअलीची मदत घेऊन दमाजीचा पराभव केला. पुरंदर किल्यावर कैदेतच त्याचा 1728 मध्ये मृत्यू झाला.

रंभाजी निबांळकर या सरदारानेही मराठ्यांच्या स्वातंत्र्य युध्दात मोठा पराक्रम केला होता. परंतु करवीर–सातारा यांच्यात स्वतंत्र गादया निर्माण झाल्यावर तो निजामाला जाऊन मिळाला व शाहूला त्रास देऊ लागला. म्हणून त्याचा पेशव्याशी संबंध आला.

औरंगजेबाच्या तंबूचे कळस कापून आणणारे विठोजी चव्हाण यांचे पुत्र उदाजी चव्हाण ही वडिलाप्रमाणेच शूर–वीर होते. 1710 मध्ये तो ताराबाईच्या पक्षात आला व शाहू महाराजांच्या प्रदेशात दंगा करू लागला. याचा परिणाम मराठी सत्तेवर झाला. वारणेच्या तहानुसार उदाजी चव्हाणांच्या ताब्यातील प्रदेश छ. संभाजी महाराजांनी शाहू महाराजांना देऊन टाकला म्हणून उदाजी चव्हाण नाराज झाला व संभाजी महाराजांच्या प्रदेशावरही हल्ले करू लागला.[8] उदाजी चव्हाण कोणत्याही पक्षास एकनिष्ठ राहू शकले नाहीत. सन 1762 च्या नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात त्यांचा मृत्यू झाला.[9]

### 3) करवीर–निजाम मैत्री व पेशव्यांना धक्का :–

इ.स. 1713 मध्ये निजाम दक्षिणेचा सुभेदार म्हणून आला परंतु त्यापूर्वी तो दक्षिणेत येऊन गेल्यामुळे त्याला दक्षिणेच्या राजकारणाचा अनुभव होता. चंद्रसेन जाधव, छ. संभाजी व निजाम यांनी शाहू विरूध्द कारवाया करण्यास सुरुवात केली. कोल्हापूरकर संभाजी, चंद्रसेन जाधव व निजाम यांच्यातील मैत्रीबद्दल शाहू सतर्क होता.10 शाहूच्या फौजा इ.स. 1725–26 नंतर दक्षिणेत मुलूख काबीज करीत असल्यामुळे करवीरकर व शाहू यांच्यात वैमनस्य येऊ लागले. त्यामुळे करवीरकांनी निजामाशी मैत्री केली व पेशव्यांना धक्का दिला. निजाम व करवीरकरांच्या फौजा पुण्याचा प्रदेश काबीज करण्यासाठी पुण्यापर्यंत जाऊन पोहोचल्या. त्यामुळे बाजीरावाने फेब्रुवारी, 1728 मध्ये पैठणजवळ पालखेड येथे निजामाचा पराभव केला.[11] यामुळे करवीरकरावर मर्यादा पडली.

### 4) वारणेचा तह :–

पालखेडच्या लढाईनंतर करवीरकराविरूध्द एकदाचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी शाहूने कोल्हापूरवर मोहिम काढली. शाहूच्या फौजेने वारणेच्याकाठी वडगाव येथे कोल्हापूरच्या फौजेचा पराभव केला. त्यातूनच 13 एप्रिल 1731 रोजी प्रसिध्द वारणा तह झाला.[12] वारणा नदीने दोन्ही राज्यांच्या सीमा निश्चित झाल्या. यानंतर बाजीराव पेशवे 9 मे, 1740 रोजी मृत्यू पावले व नानासाहेब यास पेशवेपद मिळाले. नानासाहेबांनी पेशवेपदाची वस्त्रे घेतल्यानंतर थोड्याच दिवसात छ. संभाजी व नानासाहेब पेशवे यांच्यात शाहूच्या निधनानंतर दोन्ही राज्ये एक करण्याचा गुप्त करार झाला. यापुढे नऊ वर्षे करवीर–पेशवे संबंध चांगले राहिले.

### 5) समारोप :–

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहूंची सुटका झाली व मराठी राज्यात शाहू–ताराबाई यांच्यात यादवी सुरु झाली. खेड येथे निर्णायक लढाई होऊन ताराबाईचा पराभव झाला व सातारा येथे शाहूने सत्ता स्थापन केली तर पन्हाळ्याला ताराबाईने सत्ता स्थापन केली. इ.स. 1714 मध्ये कोल्हापूरात सत्तांतर होऊन छ. संभाजी गादीवर आले. इकडे 17 नोव्हेंबर 1713 मध्ये बाळाजी विश्वनाथ पेशवे झाले. यावेळी अनेक सरदारांनी बंड केले. त्याचाही परिणाम मराठी सत्तेवर झाला. पेशव्यांनी सर्व बंडखोराबरोबरच निजामालाही वठणीवर आणले. याचा परिणाम करवीरकरांच्या महत्त्वाकाक्षांला आळा बसला. करवीर व निजाम यांच्या मैत्रीचा परिणाम सर्व मराठी राज्यावर झाला. परंतु पेशव्यांनी निजामाचा पराभव करून आपले कर्तृत्व दाखवून दिले. पुढे वारणेचा तह झाला व करवीर–पेशवे संघर्श काही काळ थांबला.

### संदर्भ :–

1) ग. ह. खरे आणि अ. रा. कुलकर्णी (संपा), मराठ्यांचा इतिहास, खंड–तिसरा, कान्टिनेन्टल प्रकाशन, पुणे–30, पृ. क्र. 352.
2) कोल्हापूर गॅझेट पृ. क्र. 332.
3) दीक्षित नी. सी., मराठ्यांचा इतिहास, पिंपळ पुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, तिसरी आवृत्ती, 1992 पृ. क्र. 96.
4) कित्ता, 98.

5) कित्ता 97.
6) Briskishore – Tarabai & Her Times P.g. 136-
7)गर्गे. स. मा., करवीर रियासत, श्री शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्ट, कोल्हापूर, पृ. क्र. 154.
8) कित्ता, 198.
9) कित्ता, 406.
10) गुजर मा. वि., क. छ. घ. इ. सा. खंड 2, पृ. क्र. 17.
11) ग. ह. खरे, उपरोक्त, पृ. क्र. 358.
12) कित्ता, 358.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net